

















नोआ आणि महापूर

ईश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

प्राप्त झाली आहे

जेनेसिस 6-10

"आपल्या वाणीतून आल्यास प्रकाश देते."
प्लाज्म 119:130

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
अनुवादक: christian-translation.com
रूपान्तरकार: M. Maillot; Tammy S.

60 गोष्टींतील 3 (पहिली)

**M1914.org**

**Bible for Children, PO Box 3, Winnipeg MB R3C 2G1 Canada**

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

मराठी Marathi







ईश्वराने नोआला चेतावणी दिली की प्रलयंकारी महापूर येऊन संपूर्ण पृथ्वीला व्यापणार. “तुझे कुटुंब आणि अनेक जनावरांना पुरेशी एक लाकडी नाव बांध.”
3
नोआला आदेश मिळाला. ईश्वराने नोआला तंतोतंत सूचना दिल्या. नोआ कामात व्यस्त झाला.
4
आपण नाव का बांधतो हे नोआने सांगितल्यास लोक कदाचित त्याची चेष्टा करत असावे.
नोआ नाव बांधत राहीला.
5
तो लोकांना ईश्वराविषयीही सांगतच होता. कोणीच त्याचे ऐकत नव्हता.
6
नोआचा ईश्वरावर फार फार विश्वास होता. यापूर्वी कधीही पाऊस पडला नसला तरी त्याचा ईश्वरावर विश्वास होता. लवकरच सामान लादण्याएवढी नाव तयार झाली.
7
आता जनावरे आली. ईश्वराने काही प्रजातींमधून सात, इतरांमधून दोन आणली. लहान आणि मोठे पक्षी, छोटे आणि उंच प्राणी नावेकडे चालू लागले.
8
नोआ जनावरांना नावेत चढवत असतांना लोकांनी कदाचित नोआचा अपमान केला.
9
ईश्वराविरूद्ध पाप करणे त्यांनी थांबविले नाही. त्यांनी नावेत प्रवेश करण्याविषयी विचारले नाही.
10
शेवटी सर्व पशु-पक्षी नावेत चढविण्यात आले. “नावेत ये”, ईश्वराने नोआला बोलाविले.
11
“तू आणि तुझे कुटुंब.” नोआ, त्याची बायको, त्याचे तीन मुलगे व त्यांच्या बायका नावेत आल्या. नंतर ईश्वराने दार बंद केले.
12
पाऊस सुरू झाला. मुसळधार पावसाने चाळीस दिवस व रात्री पृथ्वीला भिजविले.
13
पूराचे पाणी शहरे आणि गावांवरून वाहू लागले. जेव्हा पाऊस बंद झाला तेव्हा पर्वतही पाण्याच्या खाली होते. वायुचा श्वास घेणारा प्रत्येकजण मरण पावला.
14
जस जसे पाणी वाढत गेले, नाव पाण्यावर तरंगू लागली. आत काळोख असावा, कदाचित ओबडधोबड, आणि भयानकही असावे. पण नावेने नोआला महापूरापासून संरक्षण दिले.
15
पाच महिन्यांपर्यंत महापूरानंतर ईश्वराने शुष्क वारे पाठविले. सावकाश, नाव अरारत पर्वतावर जाऊन थांबली. पाणी उतरेपर्यंत नोआ आणखी चाळीस दिवस तसाच आत राहीला.
16
नोआने नावेच्या उघड्या खिडकीमधून एक डोमकावळा व एक कबूतर बाहेर सोडले. विसावण्यासाठी कोणतीही कोरडी व स्वच्छ जागा न मिळाल्याने कबूतर नोआकडे परत आले.
17
एका सप्ताहानंतर नोआने पुन्हा प्रयत्न केले. कबूतर परत येताना त्याच्या चोचीमध्ये एक नवीन ऑलिव्हचे पान घेऊन आले. पुढच्या सप्ताहात नोआला समजले की पृथ्वी कोरडी झाली आहे, कारण कबूतर परत आले नव्हते.
18